FORM-1 A

C.R.B.
F.I.F.-1

19

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अन्वये / Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य / State: महाराष्ट्र, जिल्हा / District: मुंबई, पोलीस ठाणे / Police Station: आ.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. / FIR No.: 35, वर्ष / Year: 2024, दिनांक / Date: 21/12/2024

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार शनिवार, तारीख पासून 19/10/24, वेळ ............, तारीख पर्यंत 29/10/24 वेळ ............
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा / Information received at P.S. तारीख / Date: 26/10/24, वेळ / Time: 11.00 वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No.: 15/2024, तारीख / Date: 21/12/2024, वेळ / Time: 13.40 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ............

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण / Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Direction and distance from P.S.: उत्तरेस 30 Km, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. / Chouki/Beat/O.P. Name and No. ............
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name: गोरेगाव पो. ठाणे, मुंबई, ठिकाणाचे नंबर / No. if any ............, गल्ली / Ward ............, रस्त्याचे नाव / Name of road ............
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable Place ............, गाव / Village ............, पोस्ट / Post ............, तालुका / Taluka ............, जिल्हा / Distt. ............, राज्य / State ............
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव / In case, outside the limit of this Police Station ............, तालुका / Taluka ............, जिल्हा / Distt. ............, राज्य / State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: निशांत सावंत (b) वडीलाचे / पतीचे नाव / Father's /Husband's Name: श्रीधर सावंत
   (c) जन्म तारीख व वय / Date of Birth & Age: 36 वर्षे (d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय, फोन नं. / Phone No.: 7710085858
   (e) पारपत्र क्रमांक / Passport No. ............ दिल्याचा दिनांक / Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण / Place of Issue ............ (f) व्यवसाय / Occupation: इंटेरिअर डिझायनर
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता / Address : A-203, गल्ली / सर्वे नं. / Ward ............, घर / नावे नंबर / House/Name No.: पांडुरंग दर्शन सोसायटी, फोन / मो. नंबर / Phone/M. No. ............, चिंचपाडा रोड, पॅन नं. / Pan No. ............, कल्याण पूर्व, वोटर्स नं. / Card No. ............
   रस्त्याचे नाव / Road: मुंबई, जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ............, गाव / Village ............, पोस्ट / Post ............, पो. स्टे. / P. Stn. ............
   तालुका / Taluka ............, जिल्हा / Distt.: मुंबई, राज्य / State: महाराष्ट्र, सध्याचा पत्ता / Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   चंद्रकांत सुळवदे, पोलीस उप निरिक्षक, गोरेगाव पोलीस ठाणे, मुंबई

क

फिर्यादी यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखीत करण्यात येत असून तिलाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

(गणपत परघाळे)
पोलीस निरीक्षक लाप्रवि मुंबई

21/12/2021

जबाब दि. २१/१२/२०२४

मी श्री. निशांत श्रीधर सावंत वय– ३६ वर्षे, धंदा :– इंटीरीयर डिझाईनर, रा. ठी. – ए २०३, पांडुरंग दर्शन सोसायटी, चिंचपाडा रोड, कल्याण (पूर्व), ४२१३०६ मुळ पत्ता :– मु.पो. साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, मोबाईल नं. ७७१००८५८५८/८९७६६१५२२४, आधारकार्ड क. ७५४८ ६५०९ ०९५७

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर सन २००२ पासून माझे कुटुंबासह राहत आहे. मी सन २०१४ पासून इंटीरीयर डिझाईनचे काम करतो. माहे एप्रिल २०२४ मध्ये माझी ओखळ श्रीमती शिखा गुप्ता (मेनन) यांचेशी सोशल मिडीयाव्दारे झाली. संपर्कादरम्यान मी इंटीरीयर डिझाईनर असल्याचे समजल्याने श्रीमती शिखा गुप्ता (मेनन) यांनी माझ्याशी चर्चा करून त्यांचे रूम नं. ७०२ सोसर सोलीटीयर ५ वा रस्ता, खार पश्चिम, मुंबई चे इंटीरीयरचे काम पाच लाख रूपयामध्ये दिले होते. प्रत्यक्ष काम दि. ४/०६/२०२४ रोजी पासूनच सुरू केले होते. काम करीत असताना प्रत्यक्षात पाच लाख रूपयापेक्षा जास्त खर्च येत असल्याचे मी, श्रीमती गुप्ता (मेनन) यांना पुढील काम करण्यासाठी आणखी पैसे द्यावे लागतील असे बोलले असता त्यांनी नकार दिला त्यामुळे मी दि. ०७/०९/२०२४ रोजी पासून काम बंद केले.

दि. ०४/१०/२०२४ रोजी मो.क्र. ९६५३१८१९०९ या नंबर वरून माझे मो.नं. ७७१००८८८५८ या वरती कॉल करून त्या खार पोलीस स्टेशन येथून महिला अधिकारी बोलत असल्याचे सांगून माझे विरूध्द श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांनी पैशांचा अपहार केल्याबाबत तक्रार अर्ज दिला असल्याचे सांगितले. तेव्हा मी आमचेमधील पैशांचा व्यवहार हा श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांचे गोरेगाव येथील भाडयाचा घरात झाला असल्याचे सांगितले असता त्या महिला अधिकारी यांनी माझे विरूध्दचा अर्ज गोरेगाव पोलीस ठाणे येथे पाठवत असल्याचे सांगितले. दि. १९/१०/२०२४ रोजी माझे व्हॉटसअपवर मो.नं. ७७१००८८८५८ यावर व्हॉटसअप क्र. ७७०९५७१३९७ यावरून PSI चंद्रकांत सलवदे गोरेगाव पोलीस ठाणे याचें सहीचे दि. ०३/१०/२०२४ रोजीचे चौकशी करण्याचेसाठी गोरेगाव पोलीस ठाणेमध्ये हजर राहण्यसाठी व्हॉटसॲपवरती पत्र प्राप्त झाले. त्यावरून मी व्हॉटसॲप क्र. ७७०९५७१३९७ चे प्रोफाईल पाहिले असता नमुद मोबाईल क्रमांकच्या खाली Sandesh असे लिहिले असल्याने मी त्यांचे नाव संदेश सर असल्याचे गृहित धरले. मी संदेश सर यांच्याशी व्हॉटअपवरती संपर्क करून दि. २१/१०/२०२४ रोजी गोरेगाव पोलीस ठाणे येथे जावून मो.नं. ७७०९५७१३९७ चे धारक श्री. संदेश सर यांना भेटलो त्यावेळी ते साध्या गणवेषात होते त्यांनी मला सांगितले की, श्रीमती शीख गुप्ता (मेनन) यांचा तुमच्या विरूध्द पैशाचा अपहार केल्याचा तक्रार अर्ज असून श्रीमती गुप्ता (मेनन) या सदर तक्रारी सोबतच Sexual harassment केलेबाबतचे स्टेटमेंट जोडणार आहेत. प्रकरण मिटवायचे असेल तर तुम्हाला रू. ९,५०,०००/– रोख द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा मी माझे वकील यांच्याशी चर्चा करून परत येण्याचे सांगितले. त्यानंतरही श्री. संदेश सर हे व्हॉटसॲपवरती मेसेज करून अपडेट घेत होते. दि. २५/१०/२०२४ रोजी मी आणि वकील श्रीमती मनीषा शर्मा यांच्यासोबत जावून श्री. संदेश सर यांना गोरेगाव पोलीस ठाणेत भेटले असता त्यांनी दि. २१/१०/२०२४ रोजी प्रमाणेच चर्चा केली तेंव्हा मी सिनीयर साहेबांना भेटण्याची ईच्छा सांगितल्याने त्यांनी सहमती दिली. मी माझ्या वकीलासह सीनीयर साहेबांना भेटलो व माझे म्हणणे मांडून माझे व्हॉटसॲपवर प्राप्त पत्र दाखविले असता, सिनीयर साहेबांनी PSI चंद्रकांत सलवदे असे नाव वाचून त्यांना केबिनमध्ये बोलावून घेतले तेव्हा श्री. संदेश सर हे केबिनमध्ये आले. त्यावेळी मला समजले की, श्री. संदेश सर हेच PSI चंद्रकांत सलवदे आहेत. तेव्हा मी माझे वकीलांसह केबीन बाहेर येवून थांबलो. काही वेळा नंतर श्री. संदेश सर उर्फ PSI चंद्रकांत सलवदे हे आमचे जवळ आले व त्यांनी सांगितले की, तुमच्या विरूध्दचे प्रकरण मिटवायचे असेल तर तुम्हाला आता रू. ९,५०,०००/– ऐवजी रू. १२,००,०००/– द्यावे लागतील. त्यानंतर मी विचार करून सांगतो असे बोलून वकीलासह परत आलो.

मला PSI चंद्रकांत सलवदे, गोरेगाव पोलीस ठाणे यांनी त्यांच्याकडे चौकशीकरिता असलेला श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांनी माझे विरूध्द केलेल्या अर्जाचे पुढील चौकशीमध्ये श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांचे Sexual harassment केल्याबाबत स्टेटमेंट न घेता प्रकरण मिटविण्याकरिता श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांना रोख रक्कम द्यावी लागेल असे सांगून प्रथम दि. २१/१०/२०२४ रोजी रू. ९,५०,०००/– व दि. २५/१०/२०२४ रोजी रू. ९,५०,०००/– ऐवजी रू. १२,००,०००/– लाचेची मागणी केली. PSI चंद्रकांत सलवदे यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. २६/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. समक्ष हजर राहून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठ अधिकारी यांनी स.पो.आ. सचिन जाधवर आणि पोलीस निरीक्षक गणपत परचाके यांना बोलावून माझी ओळख करून देवून माझी तक्रार नोंदवून पुढील कारवाई करण्यास सांगितले. पो.नि. गणपत परचाके यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारपूस केली. तेव्हा मी गोरेगाव पोलीस स्टेशन येथील PSI चंद्रकांत सलवदे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत यांचेविरूध्द कार्यवाही करिता स्व:हस्तलिखीत तक्रार अर्ज दिला.

सदर वेळी स.पो.आ. सचिन जाधवर व दोन पंच ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक परचाके यांनी दोन शासकीय पंचांशी यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर माझा दि. २६/१०/२०२४ रोजीचा तक्रार अर्ज पंचाना समजावून सांगून तक्रारदार यांचा तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला व त्यानंतर सदर तक्रार अर्जावर पंचाच्या सह्या घेण्यात आल्या व समक्ष म्हणुन पो.नि. परचाके नी स्वाक्षरी केली. PSI चंद्रकांत सलवदे यांचे भेटीचे ठिकाण व वेळ निश्चित करण्याकरिता ब्युरो कार्यालयाच्या गोपनीय कक्षातून माझे मोबाईल फोन क्र. ७७१००८८८५८ यावरुन PSI चंद्रकांत सलवदे यांचे मोबाईल फोन क्र. ७७०९५७१३९७ यावर व्हॉटसअॅप कॉलद्वारे संपर्क केला असता, संभाषणात मी " **हॅलो... नमस्कार साहेब... हा ते मी म्हणालो होतो संध्याकाळी फोन करतो करून... ते तेच जरा काय तुम्हाला भेटुन बोलायच होत म्हटलं ते काय कस काय करू शकतो वगैरे...' PSI चंद्रकांत सलवदे यांना बोललो असता PSI चंद्रकांत सलवदे हे 'हा निशांत... हा नमस्कार... हो हो... येना ये... ' असे मला बोलले. त्यावर मी ' कधीपर्यंत... ओके चालेल... किती वाजेपर्यंत येवु सर...' असे PSI चंद्रकांत सलवदे यांना बोललो. त्यावर PSI चंद्रकांत सलवदे 'ये मी आहे नाईटला ये... कधीही मी आजची नाईट इथे पोलीस स्टेशनला आहे... मी नाईटचा नोडल ऑफीसर आहे इलेक्शनचा... त्यामुळे मी रात्रभर असणार... हा महिना पुर्ण रात्रभर आहे मी... अकरा... साडेबारा कधीही... हं... ' असे मला बोलले त्यावर मी ' ओके चालेल बरं... ठिक आहे मग मी निघतो मग... ओके ओके सर... '** असे आमचेमध्ये बोलणे झाले. वरील संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. परचाके यांनी ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. परचाके यांनी पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पोलीस निरीक्षक परचाके यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवुन ला.प्र.वि.कार्यालयातून मी, शासकिय पंच, स.पो.आ. जाधवर, पो.नि. परचाके व स्टाफ सह दोन शासकीय वाहनातून निघालो. नमुद दोन्ही वाहने वरळी सि लिंक मार्गे, पश्चिम द्रुतगती मार्गे गोरेगाव पश्चिम मृणालताई गोरे उड्डाणपूलाच्या खाली नेस्को आय. टी. सेंटर येथे पोहोचल्यानंतर पो.नि. परचाके यांचे सुचनेवरुन दोन्ही वाहन थांबविण्यात आले.

त्यानंतर मला पोलीस निरीक्षक परचाके यांनी गोरेगाव पोलीस स्टेशन येथील PSI चंद्रकांत सलवदे यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच साळवी यांचे सह रिक्षामध्ये बसून पाठविले. गोरेगाव पोलीस ठाणेचे बाहेरून मी माझ्या मोबाईल फोन क्र. ७७१००८८८५८ यावरुन लोकसेवक PSI चंद्रकांत सलवदे यांचे मोबाईल फोन क्र. ७७०९५७१३९७ यावर संपर्क केला. संभाषणामध्ये मी **' हॅलो... हा संदेश सर आलोय मी आता... ओके... ओके ओके** मग मी तिथे थांबू... गेटवरती ना... **ओके ओके...**

' असे PSI चंद्रकांत सलवदे यांना बोललो. त्यावर PSI चंद्रकांत सलवदे यांनी ' हॅलो... अरे एक पंधरा विस मिनट टाईम दे मला... मी सिनीयर साहेबांशी भेटतोय... बाहेर येईन मी... भेटतो तुला... हा थांब थांब थांब मी कॉल करेन...' असे मला बोलले.

बराच वेळ झाला तरी PSI चंद्रकांत सलवदे यांचा कॉल न आल्याने पुन्हा मी माझ्या मोबाईल फोनवरून PSI चंद्रकांत सलवदे यांच्या मोबाईल फोनवर कॉल केला असता PSI चंद्रकांत सलवदे यांनी सदरचा कॉल उचलला नाही. त्यावेळी PSI चंद्रकांत सलवदे यांनी माझ्या व्हॉटअपवर 'दहा मिनीटात येतो असा मेसेज केला. थोडयावेळाने PSI चंद्रकांत सलवदे हे गोरेगाव पोलीस स्टेशनच्या आवारात आले व त्यांनी मला आत बोलाविले. संभाषणा दरम्यान PSI चंद्रकांत सलवदे यांनी ' ती तिने नाईन नाईनटी लिहीलेलं आहे... मग तिझ्याकडे लिगल पेमेंट जेवढा आहे तिला मी बोलतो... मी तिला एवढ पण तिने ऑलरेडीच मला पंधरा बारा लाख सांगितले...' असे मला बोलल्यावर मी ' बारा लाख नका सांगु सर...' असे बोललो असता PSI चंद्रकांत सलवदे यांनी ' डिरीक्टली तु तयारी ठेव त्याची नाईन नाईनटी दिली आहे त्याची तयारी ठेव... त्याच्या कमी आल की ते तुझ... ते तुझ्याकड... उरल तर तुझ्याकड... तयारी तर ठेव बाबा... उरल तर तुझ्याकडच... मी सांगतो की मी तिला खालीच आणणार आहे... जी अमाऊंट तिने दिली आहे ना... त्याच्या खाली आणतो... डेफिनेटली आणतो...' असे मला बोलले तेव्हा मी ' नऊ नव्वद नको ना सर...' असे बोललो असता PSI चंद्रकांत सलवदे यांनी ' हे जेवढी काय अमाऊंट आहे त्याच्यावर नाईन नाईनटी आहे ह्याच्या पण खाली आणण्याचा मी प्रयत्न करेल माझ्या पातळीवर... ठिक आहे... तिने ॲप्लीकेशन वर लिहीलेलं आहे नाईन नाईनटी... त्याच्यापण खाली आणण्याचा मी प्रयत्न करेन पुरेपुर..' असे मला बोलले त्यावर मी ' जावु दे आता ते सगळं... तुम्ही मला एक सांगा... फक्त फायनल एवढ अमाऊंट सांगा मी सोमवारी काही ना काहीतरी रेडी करून आणतो...' असे बोललो असता PSI चंद्रकांत सलवदे यांनी ' मी तुला सांगतो तयारी ठेव नाईन नाईनटीची... मी डेफिनेटली खाली आणतो... खाली आणेन हे मी तुला आता बोलल्याशिवाय तर मी कसा काय तुला डायरेक्ट सांगु.. मी तिच केवळ स्टेटमेंट टाईप केलेल आहे खारवर...' असे मला बोलले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथून निघुन पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत निघुन आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक परचाके यांनी माझे बनियनला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केले व माझेसोबत असलेल्या शासकीय पंचाकडे घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मी वर सांगितल्याप्रमाणे मिळती–जुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही सर्वजण ला.प्र.वि. कार्यालयात आलो. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकून सदर संभाषणाचे ट्रान्सस्क्रिप्ट तयार केले. PSI चंद्रकांत सलवदे यांनी माझ्या विरूध्द प्राप्त तक्रार अर्जावर कारवाई न करण्याकरिता अर्जदार यांचा अवाजवी फायदा व्हावा या उद्देशाने अर्जदार यांना देण्यासाठी म्हणून माझ्याकडे रू. ९,९०,०००/– रक्कमेची मागणी केली व दि. २८/१०/२०२४ सोमवारी गोरेगाव पोलीस स्टेशन येथे भेटण्यास बोलावले असल्याने दि. २८/१०/२०२४ सोमवारी पुन्हा पडताळणी करून सापळा कारवाई करावी असे सर्वानुमते ठरले.

दिनांक २८/१०/२०२४ रोजी दोन पंचाना ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई कार्यालयात पाचारण करण्यात आले. त्यानंतर सपोआ जाधवर, पो.नि. परचाके तसेच मी, पंच, आणि पडताळणी पथक डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मायक्रो एस.डी.कार्डसह पडताळणी करण्याकरीता गोरेगाव पोलीस ठाणे मुंबई येथे रवाना झालो.

पो.नि. परचाके यांनी मला खबरदारीच्या सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक परचाके यांनी गोरेगाव पोलीस स्टेशन येथील PSI चंद्रकांत सलवदे यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच साळवी यांचे सह रिक्षामध्ये बसून पाठविले. गोरेगाव पोलीस ठाणेचे बाहेरून मी माझ्या मोबाईल फोन क्र. ७७१००८८८५८ यावरुन लोकसेवक PSI चंद्रकांत सलवदे यांचे मोबाईल फोन क्र. ७७०९५७१३९७ यावर संपर्क केला. संभाषणामध्ये मी ' हॅलो... संदेश सर मी आलोय... ' असे PSI चंद्रकांत


21/12/2024

सलवदे यांना बोललो त्यावर PSI चंद्रकांत सलवदे यांनी ' दहा मिनटात पोहचतो... चहा घेतोय...' असे मला बोलले. त्यानंतर मी पंचासह गोरेगाव पोलीस ठाणेच्या बाहेर थांबून राहिले. त्यावेळी तिथे पोलीस ठाणेमधून एक सिव्हील कपडे घातलेला इसम तिथे आला व त्यांनी ' काय काम आहे...'असे बोलले तेव्हा मी ' संदेश सरांना भेटायला आलो होतो... संदेश सरांना...' असे बोलले. त्यावर त्या इसमाने ' कोण... कोण संदेश...' असे बोलले त्यावर मी ' चंद्रकांत अ... चंद्रकांत सलवदे... सलवदे...' असे बोलले त्यावर त्या इसमाने 'हा...असे नाईटला आहेत ते...' असे बोलले व ते तिथून निघून पोलीस ठाणेमध्ये गेले. त्यानंतर बराच वेळ झाला तरी PSI चंद्रकांत सलवदे हे आले नसल्यामुळे मी पुन्हा माझ्या मोबाईल फोनवरून PSI चंद्रकांत सलवदे यांच्या मोबाईल फोनवर कॉल केला असता PSI चंद्रकांत सलवदे यांनी सदरचा कॉल उचलला नाही. थोडयावेळाने PSI चंद्रकांत सलवदे यांचा फोन माझ्या मोबाईल फोनवर आला त्यावेळी मी माझ्या मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करून कॉल उचलला. संभाषणामध्ये PSI चंद्रकांत सलवदे हे " हॅलो... कुठे... अरे सिनीयर साहेबांनी खुप अर्जंट काम सांगितलय मित्रा.. . हॅलो... अ... अरे खुप अर्जंट काम निघाल वरं मी आलो तिथं पण साहेबांनी मला सांगितलं तिथुन लगेच मग मला लगेच निघायला लागलं तिथुन... वरं अेनी वे... अ... मी बोलेल... उद्या उद्या भेटु...' असे बोलले त्यावर मी ' आ... उद्या मग किती वाजता मग मी येवु..' असे विचारले असता **PSI** चंद्रकांत सलवदे यांनी ' अेस अेस मी सांगतो... तुला टाईम सांगतो मी चल...' असे बोलून फोन कट केला. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथून निघुन पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत निघुन आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक परचाके यांनी माझे बनियनला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केले व माझेसोबत असलेल्या शासकीय पंचाकडे घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मी वर सांगितल्याप्रमाणे मिळती–जुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही सर्वजण ला.प्र.वि. कार्यालयात आलो. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकून सदर संभाषणाचे ट्रान्सस्क्रिप्ट तयार केले. दि. २९/१०/२०२४ रोजी सकाळी फोन करतो व कधी भेटायचे ते सांगतो असे बोलल्यामुळे आज दि. २८/१०/२०२४ राजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगती करून PSI चंद्रकांत सलवदे यांचा तक्रारदार यांना भेटण्याकरिता फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पंचांना, तक्रारदार आणि पडताळणी पथक यांना पो.नि. परचाके यांनी सांगितले.

त्यानंतर दि. २९/१०/२०२४ रोजी मी PSI चंद्रकांत सलवदे यांच्या फोनची वाट पाहत असताना PSI चंद्रकांत सलवदे यांनी माझे व्हाटसअपवर ' माझी शिफ्ट चेंज झाली आहे आज मी डे ला आहे.' असा मेसेज केला. त्यावर मी 'अलिबागला क्लाईंट सोबत असल्याचा रिप्लाय दिल्यानंतर PSI चंद्रकांत सलवदे यांनी माझे व्हाटसअपवर दिनांक २८/१०/२०२४ रोजी पासून केलेले सर्व मेसेज डिलीट केले आहे. तेव्हा पासून आज पावेतो PSI चंद्रकांत सलवदे यांनी आज पावेतो कुठल्याही प्रकारचा संपर्क केलेला नाही. त्यांनी त्यांचे व्हाटसअपवर वेळोवेळी ठेवलेले स्टेट्स चे स्क्रिन शॉट मी माझे मोबाईलमध्ये घेतलेले आहे. त्यांतील मजकूर पाहता PSI चंद्रकांत सलवदे यांना मी त्यांची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली असल्याची शंका आली असावी असे वाटते. त्यानंतर PSI चंद्रकांत सलवदे यांनी माझे सोबत कुठल्याही प्रकारे संपर्क केलेला नाही.

दिनांक २२/११/२०२४ रोजी माझे व्हाटसअप क्र. ७७१००८८८५८ यावर मोबाईल क्र. ७०३०२१६२०९ या व्हाटसअप क्रमांकावरून जा.क्र. १९३/२०२४ दि. २०/११/२०२४ अन्वये मालाड पोलीस ठाणे येथून पोलीस उपनिरीक्षक मनिषा कागलकर यांच्या सहीचे मालाड पोलीस ठाणे येथील गु.र.क्र. ९२०/२०२४ कलम ७४, ३१६(२), ३१८(४), ३५२, ३५१(२), ३(५) भा.न्या.सं. चे तपासकामी मालाड पोलीस ठाणे येथे दि. २५/११/२०२४ रोजी हजर राहणेबाबतचे समजपत्र प्राप्त झाले. त्यावरून मी मोबाईल क्र.७०३०२१६२०९ यावर फोन करून पोलीस उपनिरीक्षक मनिषा कागलकर यांच्याशी प्राप्त समजपत्र संबंधाने विचारले असता त्यांनी सांगितले की, गोरेगाव पोलीस ठाणे येथून गुन्हा दाखल होवून पुढील तपासकामी त्यांना प्राप्त झाला असल्याचे सांगितले. त्यावरून गोरेगाव पोलीस ठाणे येथे माझेविरूध्दचे श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांच्या तक्रार अर्जावरून

गुन्हा दाखल करून मालाड पोलीस ठाणे येथे पाठविल्याची माझी खात्री झाल्याने मी मा. सत्र न्यायालय, दिंडोशी येथे अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केलेला असून सध्या तो प्रलंबित आहे.

तरी PSI चंद्रकांत सलवदे, गोरेगाव पोलीस स्टेशन, मुंबई यांनी त्यांचेकडे माझ्याविरूध्द प्राप्त तक्रार अर्जाचे चौकशीमध्ये अर्जदार श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांचे Sexual harassment केलेबाबतचे पुरवणी जबाब न घेता तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यासाठी तक्रार अर्जातील अर्जदार श्रीमती शीखा गुप्ता (मेनन) यांना अवाजवी फायदा होण्याच्या उद्देशाने रू. ९,९०,०००/– द्यावे लागतील असे म्हणून PSI चंद्रकांत सलवदे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केलेली आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत तक्रार आहे. PSI चंद्रकांत सलवदे यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद माझ्या सांगण्याप्रमाणे मराठीमध्ये लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून त्याची प्रिंटरद्वारे प्रिंट काढुन ती मला वाचून दाखविली व ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( गणपत पिरंगाळे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

21/12/2024
Nishant S. Sawant

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादीकडुन

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य

Total Value of properties stolen / involved —

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :

Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी यांनी पैशांचा अपहार केलेबाबतचा तक्रार अर्ज यातील आरोपी लोकसेवक यांना पुढील चौकशीकामी प्राप्त झाला असता। यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आलोसे यांनी फिर्यादीस गोरेगाव पो.ठाणेस बोलवुन तक्रार अर्जातील अर्जदार शिखा गुप्ता यांचे लैंगिक प्रकरणाबाबत पुरवणी जबाब नोंद न करता त्यांचा तक्रार अर्ज दफ्तरी दाखल करण्यासाठी अर्जदार यांचा अवाजवी फायदा होण्याच्या उद्देशाने दिनांक २६/१०/२०२४ रोजी यातील फिर्यादी यांचेकडे शिखा गुप्ता यांचेसाठी १,१०,०००/- रुपये द्यावे लागतील असे बोलुन लाचेची मागणी केली म्हणुन भा.प्र.अधिनियम कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..................., जिल्हा ..................., राज्य ...................,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. .............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................................. (3) Transferred to P.S ..................................................., District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.
21/12/2024

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name २।०।पाटे परब्धाके
पदनाम Rank पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई.
तपासिक अं. चा कोड. क्र. ...................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...................
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ............................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**